# सेन्सेक्स पुढील वर्षात १ लाखांचा टप्पा ओलांडण्याचा अंदाज

**मुंबई :** शेअर बाजाराने या वर्षी सप्टेंबरमध्ये प्रथमच ८५ हजारांचा टप्पा ओलांडला आणि उदयोन्मुख शेअर बाजारांमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली. या परिस्थितीत सेन्सेक्स पुढील वर्षाच्या अखेरीस एक लाखाची ऐतिहासिक पातळी ओलांडू शकतो. उत्पन्नात भक्कम उत्पन्न वाढ आणि देशात येत असलेला भांडवली निधीचा ओघ तसेच सर्वसमावेशक आर्थिक स्थिरता या बळावर सेन्सेक्स १,०५,००० च्या पातळीवर पोहोचेल, असा अंदाज मॉर्गन स्टँले या बहुराष्ट्रीय गुंतवणूक बँक आणि वित्तीय सेवा कंपनीने व्यक्त केला आहे.



सेन्सेक्सने ८५ हजारांचा टप्पा ओलांडला होता, त्या वेळीदेखील देशातील अर्थतज्ज्ञांनी असेच भाकित केले होते. या वर्षी २४ सप्टेंबर रोजी सेन्सेक्स प्रथमच ८५,०४४ अंकांच्या विक्रमी उच्चांकावर गेला होता. त्याच दिवशी निफ्टी ३० अंकांनी वाढून २५,९६९ अंकांच्या पातळीवर गेला. सेन्सेक्स पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला १ लाख अंकांच्या पातळीवर जाईल आणि ही उच्च पातळी असेल. शेअर बाजारात निश्चितच तेजीचा टप्पा आहे, असे भांडवल बाजारातील निरीक्षकांनी सांगितले.

### सततच्या विक्रीला वेसण

विदेशी गुंतवणूकदार संस्था आपली रणनीती बदलत आहेत आणि खरेदीदार बनण्याचे धोरण स्वीकारत आहेत. विदेशी गुंतवणूकदार संस्थांची सतत सुरु असलेली विक्री आणि भौगोलिक राजकीय परिस्थिती असूनही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे भांडवल बाजार विश्लेषकांनी म्हटले आहे. मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे सिद्धार्थ खेमका यांच्या मते, विदेशी गुंतवणूकदार संस्थांची डिसेंबरची सुरुवात सकारात्मकतेने झाली असून आहे, ज्यामुळे बाजारातील सकारात्मक वातावरणात लक्षणीय वाढ झाली आहे.

### बाजार भांडवलात लक्षणीय वाढ

शेअर बाजारात सध्या सुरू असलेल्या तेजीमुळे मुंबई शेअर बाजाराच्या बाजार भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. बीएसईचे बाजार भांडवल पुन्हा एकदा ४५० लाख कोटींच्या पुढे गेले आहे. गेल्या तीन व्यापार सत्रांमध्ये सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही कंपन्यांनी ४ टक्क्यांहून अधिक परतावा दिला आहे. या काळात बीएसईच्या बाजार भांडवलात १० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. सध्या मुंबई शेअर बाजारात नोंदणी असलेल्या सर्व कंपन्यांचे बाजार भांडवल ४५४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

## सॅम्को म्युच्युअल फंडने आणला एनएफओ

**मुंबई :** सॅमको असेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने मल्टी असेट अलोकेशन फंडाची (एमएएएफ) न्यू फंड ऑफर जाहीर केली असून हा फंड १८ डिसेंबर २०२४ रोजी बंद होणार आहे. हा फंड धोरणात्मक पद्धतीने इक्विटी, सोने आणि डेट/अर्बिट्रेजमध्ये रोटेट होणार असून त्यामुळे परतावे वाढतील व जोखीम कमी होईल. या योजनेची किमान अर्ज रक्कम ५,००० रुपये आहे. प्रमुख आर.ओ.टी.ए.टी.ई. धोरणासह या फंडामध्ये प्रामुख्याने इक्विटी तेजीत असताना प्रामुख्याने इक्विटी मोडमध्ये रोटेट करण्याची क्षमता या फंडामध्ये आहे, तर इक्विटी मंदावल्यानंतर सोने उत्कृष्ट कामगिरी करत असल्यास तो सोन्यात रोटेट करतो.

## स्वस्त कर्ज, कमी कर, पीएम-किसान रक्कम दुप्पट करण्याची शेतकऱ्यांची मागणी

### अर्थसंकल्पपूर्व बैठकीत प्रस्ताव

**नवी दिल्ली :** स्वस्त दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून द्यावे, कमी कर लागू करावा आणि पीएम-किसान उत्पन्न समर्थन दुप्पट करावे, अशी विनंती शेतकऱ्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पपूर्व बैठकांचा एक भाग म्हणून शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी भागधारकांची बैठक घेतली. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपला प्रस्ताव ठेवला. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी आणि वित्त आणि कृषी मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

बैठकीत विविध प्रस्तावांवर दोन तास सविस्तर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक दिलासा, बाजार सुधारणा आणि धोरणात्मक गुंतवणूक यासारख्या कृषी क्षेत्रातील अनेक आव्हानांवर उपायांचा उहापोह करण्यात आला. भारत कृषक समाजाचे अध्यक्ष अजय वीर जाखड यांनी कृषी उत्पादकता आणि शेतकरी कल्याणाला चालना देण्यासाठी लक्ष्यित हस्तक्षेपांच्या गरजेवर भर दिला. राष्ट्रीय कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी हरभरा, सोयाबीन आणि मोहरी यांसारख्या विशिष्ट पिकांवर लक्ष केंद्रित करण्याकरिता आठ वर्षांसाठी वार्षिक १,००० कोटी रुपयांची लक्ष्यित गुंतवणूक धोरण जाखर यांनी प्रस्तावित केले.



कृषी कर्जावरील व्याजदर एक टक्क्याने कमी करणे आणि वार्षिक पीएम-किसान हप्ता सहा हजार रुपयांवरून बारा हजार रुपयांपर्यंत वाढवणे समाविष्ट आहे. करप्रणाली सुधारणा प्रस्तावांतर्गत कृषी यंत्रे, खते, बियाणे आणि औषधांवर जीएसटी सूट अशा प्रमुख मागण्या शेतकऱ्यांनी केल्या. पीएचडी चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने कीटकनाशकांवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्याची विनंती केली. भारतीय किसान युनियनचे प्रवक्ते धर्मेंद्र मलिक यांनी किमान आधारभूत किंमत यंत्रणेचा सर्वसमावेशक आढावा घेण्याची मागणी करताना जमिनीचे भाडे, शेतमजुरी आणि काढणीनंतरचा खर्च एमएसपीच्या गणनेत समाविष्ट केला पाहिजे, असे सुचवले.

## लॉजिस्टिक खर्च कमी करण्याची सरकारची योजना

### केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी

**नवी दिल्ली :** येत्या दोन-तीन वर्षांत देशातील लॉजिस्टिक खर्च एक अंकी पातळीवर आणण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशात लॉजिस्टिक खर्च सध्या दोन अंकी म्हणजे १४-१६ टक्के आहे. दोन ते तीन वर्षांत लॉजिस्टिक खर्च ९ टक्क्यांपर्यंत खाली येईल. भारताचा आर्थिक स्पर्धात्मकतेत लक्षणीय वाढ होईल, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

लॉजिस्टिक क्षेत्रातील अडथळे दूर करण्यासाठी सरकारने अनेक धोरणात्मक धोरणे सुरू केली आहेत. यामध्ये प्रधानमंत्री गति शक्ती-राष्ट्रीय मास्टर प्लॅन आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण यांचा समावेश असल्याचे गडकरी यांनी मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना सांगितले.

हायड्रोजन आणि सीएनजी निर्मितीसाठी बायोमास आणि बायोडायजेस्टर तंत्रज्ञानाच्या संभाव्यतेवर प्रकाश टाकताना गडकरी यांनी भविष्यासाठी एक प्रमुख इंधन स्रोत म्हणून हायड्रोजनचा शोध घेण्याची गरज व्यक्त केली. येत्या १० वर्षांत देश पर्यायी आणि जैवइंधनातही जगाचे नेतृत्व करेल, असेही ते म्हणाले.

सध्या टोलचे एकूण उत्पन्न ५२ हजार कोटी रुपये आहे. दोन वर्षांत हे उत्पन्न १.४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ग्रीन एक्स्प्रेस हायवे बांधण्यात येत असून निधीची कोणतीही अडचण नाही. कारण, आम्ही हाती घेतलेला प्रत्येक प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहे, असे गडकरी म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाणी, वीज, वाहतूक आणि दळणवळण यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. नावीन्यपूर्ण धोरणे आणि सहयोगी प्रयत्नांच्या महत्त्वावर गडकरी यांनी जोर दिला.

## ह्युंदाईच्या मोटारी नवीन वर्षापासून महागणार

**नवी दिल्ली :** उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड या आघाडीच्या कंपनीने गुरुवारी आपल्या सर्व मॉडेल्सच्या किमतीत २५ हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याची घोषणा केली. नवीन किमती १ जानेवारीपासून लागू होतील. सर्व मॉडेल्सच्या किमतींमध्ये वाढ करण्यात येणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडमध्ये ह्युंदाईचा प्रयत्न नेहमीच वाढता खर्च शक्य तितक्या प्रमाणात शोषून घेण्याचा असतो. त्यामुळे आमच्या ग्राहकांवर कमीत कमी परिणाम होईल, याची काळजी घेतली जाते. उत्पादन खर्चात वाढ, प्रतिकूल विनिमय दर आणि लॉजिस्टिक खर्चात वाढ, यामुळे किंमत वाढ आवश्यक असल्याचे कंपनीचे पूर्ण वेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण गर्ग यांनी सांगितले.

**महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** 3रा मजला, साउथ विंग, अदाणी कॉर्पोरेट हाऊस, शांतिग्राम, वैष्णोदेवी सर्कल, अहमदाबाद

वेबसाईट: www.adanienergysolutions.com

### जाहीर सूचना

**वित्तीय वर्ष 2022–23 आणि वित्तीय वर्ष 2023–24 मधील एआरआरचे ट्रू–अप, एमइआरसी एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 नुसार वित्तीय वर्ष 2024–25 मधील एआरआरचे तात्पुरते ट्रुईंग अप आणि एमइआरसी एमवायटी रेग्युलेशन, 2024 नुसार वित्तीय वर्ष 2025–26 ते वित्तीय वर्ष 2029–30 साठी एआरआरच्या प्रक्षेपणला मंजुरी मिळण्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड यांनी केलेल्या याचिकेवर सूचना/हरकती.**

**[केस क्र. 182 सन 2024]**

1. वित्तीय वर्ष 2022–23 आणि वित्तीय वर्ष 2023–24 मधील एआरआरचे ट्रू–अप, एमइआरसी एमवायटी रेग्युलेशन, 2019 नुसार वित्तीय वर्ष 2024–25 मधील एआरआरचे तात्पुरते ट्रुईंग अप आणि एमइआरसी एमवायटी रेग्युलेशन, 2024 नुसार वित्तीय वर्ष 2025–26 ते वित्तीय वर्ष 2029–30 साठी एआरआरच्या प्रक्षेपणला मंजुरी मिळण्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड (एमइजीपीटीसीएल) यांनी (केस क्र. 182 सन 2024)ची याचिका दाखल केली आहे.
2. आयोगाने 04 डिसेंबर, 2024 रोजी याचिका दाखल करून घेतली आणि सदर सूचनेच्या द्वारे जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी वीज कायदा, 2003 सेक्शन 64(2) अंतर्गत एमइजीपीटीसीएल यांना सूचना प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले आहेत.
3. याचिकेची मूख्य वैशिष्ट्ये खाली देण्यात आली आहेत:

**तक्ता 1 : वित्तीय वर्ष 2022–23 आणि वित्तीय वर्ष 2023–24 करीता एआरआरची ट्रु अप, आणि वित्तीय वर्ष 2024–25 करीता एआरआरची तात्पुरते अचूक समायोजन** (रु. कोटी)

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष 2022–23 | | वित्तीय वर्ष 2023–24 | | वित्तीय वर्ष 2024–25 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | लेखापरीक्षित |
| 1. | प्रचालन आणि परिरक्षण खर्च | 115.71 | 139.80 | 119.95 | 146.54 | 124.33 | 124.33 |
| 2. | घसारा खर्च | 304.13 | 306.30 | 304.25 | 306.97 | 304.35 | 307.41 |
| 3. | कर्ज भांडवलावरील व्याज | 205.19 | 217.19 | 166.84 | 177.04 | 128.44 | 136.85 |
| 4. | खेळते भांडवलावरील व्याज | 17.18 | – | 26.11 | 26.79 | 26.13 | 28.94 |
| 5. | आयकर | | | | | – | – |
| 6. | आकस्मिकता राखिवसाठी योगदान | 14.46 | 14.69 | 14.47 | 13.90 | 14.48 | 14.57 |
| **7.** | **एकूण महसूली खर्च** | **656.67** | **677.98** | **631.62** | **671.24** | **597.74** | **612.10** |
| 8. | अधिक: समभाग भांडवालावरील परतावा | 294.48 | 328.01 | 294.59 | 328.31 | 294.69 | 296.87 |
| **9.** | **एकूण महसूल आवश्यकता** | **951.15** | **1005.99** | **926.21** | **999.55** | **892.43** | **908.97** |
| 10. | वजा: गैर–शुल्क उत्पन्न | 4.62 | 3.95 | 5.54 | 3.19 | 6.46 | 6.60 |
| 11. | अधिक: पारेषण उपलब्धतेसाठी मोबदला | | | | | | |
| 12. | अधिक: ओ अँण्ड एम/आयओडब्ल्यूसी यांना फायदा/(नुकसान) यांचे वाटप करून झाल्यावर निव्वळ पात्रता | | (10.42) | | 17.37 | | |
| **13.** | **निव्वळ एकंदर महसूली आवश्यकता** | **946.53** | **991.62** | **920.67** | **978.99** | **885.97** | **902.37** |
| 14. | अधिक: मागील तफावती | 39.75 | 39.75 | 746.58 | 746.58 | 780.20 | 780.20 |
| 15. | अधिक: आधीच्या कालावधीच्या तफावतीवर आयकराचा प्रभाव | | | | 226.02 | | |
| 16. | वजा: संपूर्ण वर्षात टीएसयूजकडुन वसुल केलेला एकंदर महसुल | 986.28 | 914.17 | 1,667.25 | 1,667.25 | 1,666.17 | 1,666.17 |
| **17.** | **महसुली तफावत/(अतिरिक्त)** | **0.00** | **117.20** | **0.00** | **284.33** | **0.00** | **16.40** |

**तक्ता 2: वित्तीय वर्ष 2025–26 ते वित्तीय वर्ष 2029–30 करीता प्रस्तावित एआरआर** (रु. कोटी)

| अनु. क्र. | तपशील | वित्तीय वर्ष 2025–26 | वित्तीय वर्ष 2026–27 | वित्तीय वर्ष 2027–28 | वित्तीय वर्ष 2028–29 | वित्तीय वर्ष 2029–30 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | प्रचालन आणि परिरक्षण खर्च | 134.90 | 158.65 | 184.91 | 192.32 | 200.88 |
| 2. | घसारा | 236.17 | 231.09 | 135.46 | 135.26 | 134.71 |
| 3. | कर्जावरील वित्तिय शुल्कांसह व्याज | 104.11 | 108.07 | 115.93 | 98.00 | 80.11 |
| 4. | खेळते भांडवलावरील व्याज | 24.06 | 18.97 | 19.39 | 19.30 | 19.23 |
| 5. | आकस्मिकता राखिवसाठी योगदान | 14.60 | 14.75 | 16.48 | 16.48 | 16.48 |
| **6.** | **एकूण महसूली खर्च** | **513.84** | **531.53** | **472.17** | **461.37** | **451.42** |
| 7. | समभाग भांडवालावरील परतावा | 330.67 | 351.88 | 371.41 | 371.41 | 371.41 |
| **8.** | **ढोबळ एकूण महसूल आवश्यकता** | **844.51** | **883.40** | **843.58** | **832.78** | **822.83** |
| 9. | वजा: गैर–शुल्क उत्पन्न | 7.55 | 8.51 | 9.59 | 10.66 | 11.74 |
| **10.** | **निव्वळ एकूण महसूली आवश्यकता** | **836.96** | **874.89** | **833.99** | **822.12** | **811.09** |
| 11. | मागील वसुली | 345.83 | | | | |
| 12. | एकतुनी बेजसाठी मागील वसुली | 22.82 | | | | |
| 13. | वित्तीय वर्ष 2022–23 आणि वित्तीय वर्ष 2023–24 साठी वहन खर्च | 79.56 | | | | |
| **14.** | **एकूण वार्षिक महसूल आवश्यकता** | **1,285.17** | **874.89** | **833.99** | **822.12** | **811.09** |

नोंद: मागील तफावती तक्ता 1 मध्ये उल्लेखित अनुसार संबंधीत वर्षांमध्ये प्रस्तावित केल्या आहेत.

4. विस्तृत याचिका दस्तावेज आणि कार्यकारी गोषवारा एमइजीपीटीसीएलच्या वेबसाईट – (https://www.adanienergysolutions.com) वर उपलब्ध आहे आणि कार्यकारी गोषवारा आयोगाच्या वेबसाईट www.merc.gov.in वर डाऊनलोड करण्यायोग्य प्रारूपामध्ये (नि:शुल्क) उपलब्ध आहे.
5. खालील दस्तावेजाच्या प्रती लेखी विनंती करून एमइजीपीटीसीएलच्या कार्यालयामधून प्राप्त करता येतील.
   अ. प्रस्तावाचा कार्यकारी गोषवारा (नि:शुल्क, मराठी/इंग्रजीमध्ये).
   ब. सविस्तर याचिका दस्तावेज सीडीसह (इंग्रजीमध्ये) (रोख/डीडी द्वारे रु. 100/– जमा करून) ''अहमदाबाद'' येथे देय असलेल्या **''महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड''** नावे काढलेल्या.
   क. सविस्तर याचिका दस्तावेज (इंग्रजीमध्ये) (रु. 50/– जमा करून).
   ड. सविस्तर याचिका दस्तावेज सीडीसह (इंग्रजीमध्ये) (रु. 50/– जमा करून).

| कार्यालय | पत्ता | फोन:/फॅक्स नं. | इ–मेल |
|---|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड, 3रा मजला, साउथ विंग, अदाणी कॉर्पोरेट हाऊस, शांतिग्राम, वैष्णोदेवी सर्कल, अहमदाबाद | फोन: 07925550779 | prashant.kumar1@adani.com |

6. आयोगाने एमइजीपीटीसीएलला त्यांच्या ह्या जाहिरातीद्वारे त्यांच्या याचिकेवर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. प्रसिध्द झालेल्या जाहीर सूचनेला प्रतिसाद म्हणून सूचना/हरकती सादर करू पहाणारी कोणतीही व्यक्ती एमइआरसी वेबसाईट (www.merc.gov.in/e-public-consultation) वरील **'इ–पब्लिक कन्सल्टेशन'** टॅबद्वारे लेखी स्वरूपात इंग्रजी अथवा मराठी भाषेमधून ते सादर करू शकते. सदर फिचर उघडण्यात कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास संबंधित हितसंबंधी व्यक्ती मोबाइल नं.: 8928071522 वरून एमइआरसी कार्यालयाशी संपर्क साधू शकतात किंवा कामकाजाच्या सर्व दिवशी सकाळी 10.00 ते संध्या. 5.00 दरम्यान इमेल आयडी: suggestions@merc.gov.in वर त्या अपलोड करू शकतात.
7. **'इ–पब्लिक कन्सल्टेशन'** वर सूचना व हरकती अपलोड केलेल्या कोणत्याही व्यक्तिने आपल्या सादरीकरणाची कोणतीही हार्ड कॉपी फाइल करून ठेवणे गरजेचे नाही, इलेक्ट्रानिक माध्यम उपलब्ध नसणाऱ्या व्यक्ती आपल्या सूचना व हरकती महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड (एमइजीपीटीसीएल), अदाणी कॉर्पोरेट हाऊस, अदाणी शांतिग्राम, अहमदाबाद – 382421, [फोन: 07925550779, इमेल: prashant.kumar1@adani.com] आणि त्यात पाठविणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेलचा पत्ता, काही असल्यास यांच्या सेवांच्या पुराव्यासह **दि सेक्रेटरी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी), 13 वा मजला, सेंटर नं. 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–400 005** यांच्या नावे पत्र लिहून त्या पाठवू शकतात. **31 डिसेंबर, 2024** रोजी **संध्या. 5** नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. इतर कोणत्याही पध्दतीने सादर केलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.
8. एमइजीपीटीसीएलकडून प्रत्येक हरकती/अभिप्राय प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसात उत्तर देण्यात येईल परंतु **31 डिसेंबर, 2024** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांना **03 जानेवारी, 2025** पर्यंतच प्रत्युत्तर देतील. एमइजीपीटीसीएलद्वारे पाठविलेल्या प्रत्युत्तरावर हितसंबंधीत त्यांचे प्रतिउत्तर सार्वजनिक सुनावणी दरम्यान किंवा **10 जानेवारी, 2025** पर्यंत सादर करू शकतील.
9. जर वरील परिच्छेद 6 नुसार पत्रपाठविणाऱ्याने/हरकत घेणाऱ्याने आपले अभिप्राय/सूचना पाठविल्या असतील आणि इ–पब्लिक हिअरींग मध्ये त्याला त्याचे म्हणणे मांडावयाचे असेल तर सूचना/हरकती सादर करण्याच्या वेळेस त्याने/तिने तसे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. अशा वेळेस वैध इ–मेल आयडी आणि मोबाइल नंबर सादर करणे अनिवार्य असेल. आयोग आपल्या स्वत:च्या अधिकारात अशा पत्रलेखकाला/हरकत घेणाऱ्याला **07 जानेवारी, 2025** रोजी **सकाळी 10.30** वाजता घेण्यात येणाऱ्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये आपले म्हणणे मांडण्याची परवानगी देऊ शकेल, आणि त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.
10. इ–पब्लिक हिअरींगला उपस्थित राहणाऱ्या सर्व सभासदांना आयोगाने 14 नोव्हेंबर, 2022 रोजी सादर केलेल्या ''आयोगासमोरील याचिकेच्या इ–सुनावणीसाठी पालन करावयाच्या कामकाजाच्या पध्दती व शिष्टाचार'' याबाबत दिलेल्या प्रॅक्टिस डायरेक्शन्सचे पालन करावे लागेल.

स्थळ: मुंबई
तारीख: 09 डिसेंबर, 2024

सही: नाव: प्रशांत कुमार
हुद्दा: हेड–रेग्युलेटरी व कमर्शियल
**महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड**

## बच्चे कंपनीसाठी सुडोकु

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3 |
| | 1 | | |
| | | | 2 |
| 2 | | 3 | |

◆ **बच्चे कंपनीसाठी सुडोकू :** ४ बाय ४च्या या चौकटीत काही संख्या दिलेली आहेत. यातील रिकाम्या चौकटी भरा आणि हे छोटे सुडोकू पूर्ण करा. कोणत्याही १ ओळीत एक आकडा एकदाच आला पाहिजे. या प्रमाणे सर्व चौकटी भरा आणि सोडवा छोटे सुडोकू. उभ्या आणि आडव्या ओळीत ४च चौकटी असतील आणि कोणताही आकडा पुन्हा येणार नाही.

## मध्यम सुडोकू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 1 | | 3 | 6 | 2 |
| 3 | | 6 | 4 | | |
| 2 | 4 | | 6 | | |
| | | 3 | | 1 | 4 |
| | | 2 | 1 | | 6 |
| 1 | 6 | 4 | | 2 | |

◆ **मध्यम सुडोकू :** बॉक्समध्ये १ ते ६ क्रमांक अशाप्रकारे भरा की २ बाय ३ च्या चौकटीत कोणताही एक आकडा पुन्हा येणार नाही.


**मागील बच्चे सुडोकूचे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 1 | 4 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 1 | 3 | 4 | 2 |
| 2 | 4 | 3 | 1 |

**मागील मध्यम सुडोकूचे उत्तर**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 5 | 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 4 | 1 | 6 | 5 | 3 |
| 3 | 6 | 4 | 5 | 2 | 1 |
| 5 | 1 | 2 | 3 | 6 | 4 |
| 4 | 3 | 6 | 2 | 1 | 5 |
| 1 | 2 | 5 | 4 | 3 | 6 |

## चौफेर नगरी शब्दकोडे



**आडवी विधाने :**
१. सलग १३१ आठवडे चाललेला जयश्री गडकर यांचा एक चित्रपट ५. दोन वर्षांहून अधिक काळ चाललेला अलका कुबलचा एक चित्रपट १०. दुर्ग, डोंगरी किल्ला ११. परस्पर विरुद्ध वस्तूंची भेसळ, ढवळाढवळ, मनातील चलबिचल १३. भारताचा राष्ट्रीय पक्षी १४. घोडा, उंट इ. ची विष्ठा १५. नलिका, बारीक नळकांडे १६. 'वक्त', 'नीलकमल' या जुन्या चित्रपटांचे अभिनेते १८. निवडणुकीत उमेदवार घरोघरी जाऊन करतात ती स्वतःची जाहिरात २०.लढाईत शौर्य गाजविणारी स्त्री, रणरागिनी २२. शुद्ध, निर्मळ, पाक, पावन २४.एक मराठी अभिनेत्री-*** आचरेकर २५. विश्व, सृष्टी, दुनिया २६. थंड हवामानात होणारे, लाल रंगाचे, आंबट गोड चवीचे एक फळ २८. वस्तुस्थितीस धरून, प्रत्यक्षात, खरे, वास्तववादी ३०.बलवान,ताकदवान, सामर्थ्यवान (हिंदी) ३२. कच्च्या मालापासून नवीन उत्पादन बनविण्याचे औद्योगिक ठिकाण ३४. निर्लज्ज, बेशरम, कोडगा ३६. नीरस, बेचव, अळणी, पचपचीत ३७.कडधान्याचा अर्धा भाग,डाळ (हिंदी) ३८. बैलांच्या नाकातील दोरी ४०. पुणे जिल्ह्यातील एक औद्योगिक शहर व एक किल्ला ४२. उत्तर प्रदेशातील लखनौ शहराजवळून वाहणारी नदी ४३. वर्तुळाचा किंवा चाकाचा आकार, वाटोळा ४४. थंड, गार, मुलींचे एक नाव ४६. परवानगी पत्र (हिंदी), 'शमा'चा जोडीदार ४८. गुरे खातात ती जोंधळ्याची वाळलेली ताटे, वैरण ४९. लेखणी, पेन (उर्दू), कायद्यातील अनुच्छेद, धारा ५०. अशक्त, कमजोर, कृश, रोडका ५१.डोक्याचा पुढचा भाग,मुखडा, मुखचर्या ५२. आवश्यकता, गरज (हिंदी)

**उभी विधाने :**
१. हळदीसाठी प्रसिद्ध असलेला महाराष्ट्रातील एक जिल्हा २. दाट, गाढ, घन, निबिड ३. 'सर्वांचा विचार घ्यावा, पण स्वतःला योग्य वाटेल तेच करावे' या अर्थाची म्हण ४. आजच्या अगोदरचा दिवस ५. केसांसाठी उपयुक्त एक औषधी वनस्पती, भृंगराज ६. जुन्या हिंदी चित्रपटांची एक प्रसिद्ध 'कॅब्रे डान्सर' ७. तांदूळ,भाजी इ.धुण्याची टोपली, परडी ८. गोड बोलून वश करून घेण्याचा उपाय, सौम्य उपचार ९. कोंब, अंकुर, मोड १२. पुष्कळ, अवाजवी, अमाप, वाटेल तसे १६. क्रोध, संताप, चीड १७. आठवड्यातील शाळेचा सुट्टीचा वार१८. 'तो मी नव्हेच', 'अश्रूंची झाली फुले', या नाटकांचे अभिनेते १९. मदनाची पत्नी २०. विद्युत, दामिनी २१. ओळ, पंक्ती २३. त्रासलेला, बेजार, हैराण २७. रिवाज, पद्धत, तऱ्हा, चाल २९. विकास करणारा, डेव्हलपर ३०. मुकुट, शिरोभूषण, किरीट (उर्दू) ३१. शिजवलेली व ठेचून पातळ केलेली डाळीची पिवळी आमटी ३३. जळून राख झालेले, भस्मसात ३४. कमीत कमी, किमान पक्षी, अखेरची गोष्ट म्हणून ३५. एक रंग, तांबडा ३९. मृत पतीच्या चितेवर स्वतःस जाळून घेणारी स्त्री, साध्वी ४०. श्रीदेवीची दुहेरी भूमिका असलेला एक चित्रपट ४१. 'इल्जाम', 'हत्या' या चित्रपटांतील गोविंदाची नायिका ४२. क्षेत्रफळानुसार भारतातील सर्वात छोटे राज्य ४३. साखरेची चव, मधुर ४५. एक जुने हिंदी गायक - *** मेहमूद ४७. युद्धभूमी, वाळूचे मैदान ४८. लग्नातील करवलीच्या हातातील मंगल कलश

## कालचे चौफेर नगरीचे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ति | श | हा | णा | त्या | चा | बै | ल | रि | का | मा |
| ज | रु | र | त | | ग | रा | रा | | का | ळ | जी |
| | प | द | भा | र | | | ग | र | म | | |
| मो | ती | | र | क्त | पा | त | | वा | टे | क | री |
| द | बा | व | | चं | ग | ळ | | | क | पा | त |
| | ला | ळ | | | | ला | वा | ई | | डा | ळ |
| आ | जी | | त | न | खा | | शा | दी | | क | ल |
| नं | | दा | ब | | ना | वि | न्य | | ति | रं | गा |
| द | ला | ई | ला | मा | | शा | | | ख | टा | व |
| शिं | ग | | | फ | स | ल | | पा | ट | | |
| दे | व | | थ | क | वा | | रु | ल | | गं | ध |
| | | ड | का | | र | वीं | द्र | म | हा | ज | नी |